दै. पुढारी ११ सप्टेंबर 2003

कमला कॉलेज : शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते. यावेळी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

दै. सकाळ ८ सप्टेंबर 2003

## कमला कॉलेजमध्ये व्याख्यान

**कोल्हापूर, ता. ८ :** कमला कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त जनसाक्षरता काळाची गरज या विषयावर रामराव नांद्रे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. एस. व्ही. बागल होते. जनसाक्षरता अभियान व राष्ट्रीय व सेवा योजना यांनी आयोजन केले. या वेळी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते. प्रा. अनिल घस्ते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ए. एस. नरके यांनी आभार मानले.

दै. तरुण भारत ११ सप्टेंबर 2003

## कमला कॉलेजमध्ये पोषक आहार सप्ताह

**कोल्हापूर ■**

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजतर्फे राष्ट्रीय पोषक आहार सप्ताहनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भित्तीपत्रक प्रकाशित करणत आले. आहार विषयक निबंध लेखन स्पर्धेत अनुक्रमे विजेत्या कु. पुष्पा कुरणे, कु. प्रियदर्शनी मोहिते, कु. सिंधू वायदंडे.. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजन प्रा. रेखा पंडित, प्रा. वर्षा साठे यांनी केले.